# आंबेडकरवादी कवयित्रींच्या स्त्रीवादाचे वेगळेपण

**डॉ. प्रशांत सुर्यवंशी**
श्री पुरुषोत्तम थोटे समाजकार्य
महाविद्यालय , नागपूर

**प्रास्ताविक :-**

दलित साहित्य हे जीवन वादी आणि कलावादी साहित्य आहे नुसते साहित्यच नसून ती एक चळवळ आहे 1960 नंतर साहित्यामध्ये वेगवेगळ्या प्रवाहांचा उदय झाला त्या प्रवाहामध्ये दलित साहित्याचा प्रवाहही जोरकस होता या दलित साहित्यामध्ये लेखक दलित कवी दलित कवयित्री असे विविध भाग पडतात आपण इथे दलित कवयित्रींच्या अर्थातच आंबेडकरवादी कवयित्रींच्या स्त्रीवादाचे वेगळेपण जाणून घेणार आहोत 1960 नंतर या कविता लेखन दिसून येत असली तरी त्याही आधीपासून कविता दिसतात पारंपारिक मराठी साहित्याला आंबेडकरवादी साहित्यांनी जबरदस्त आव्हान दिलेले आहे असे असतानाच दलित साहित्याच्या तथा आंबेडकरी साहित्य संप्रदायाचे समालोचन हा ग्रंथ 1961 आली अप्पासाहेब रणपिसे यांनी दलित साहित्य बाबासाहेबांची प्रेरणा असल्यामुळे या साहित्याला आंबेडकरवादी साहित्य म्हणण्यात येऊ लागले-

**उद्दिष्टे :-**

१. दलित स्त्री जीवनातील रुढी परंपरेने निर्माण केलेली जातीय चौकट मोडून काढणे.
२. स्वातंत्र्य, समता, बंधुता या न्यायाने दलित स्त्रियांना स्वयंपूर्ण बनविण्यास प्रोत्साहित करणे.
३. दलित आंबेडकरवादी लेखन करणाऱ्या स्त्रियांवर झालेल्या अन्यायाला लेखणीच्या माध्यमातून साहित्यातून वाचा फोडणे.
४. शूद्रातिशूद्र ही संकल्पना मोडीत काढून त्या स्त्रीला आंबेडकरवादी लेखिका म्हणून पुढे आणणे.

1976 सली मुंबई येथे महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेने राजा ढाले यांच्या अध्यक्षतेखाली बौद्ध साहित्य संमेलन घेतले होते त्यात राजा ढाले यांनी आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य ही संकल्पना मांडली ते म्हणाले होते की, तुम्हाला आज मी आंबेडकरवादी जनता व तुमच्या साहित्याला आंबेडकर प्रणाली साहित्य असे म्हणणार आहे. आपण आहोत आंबेडकर प्रणाली चे साहित्यिक आणि आपले साहित्य आहे आंबेडकरवादी साहित्य आंबेडकरी प्रेरणांचे साहित्य या सज्ञा बदलांचे गंगाधर पानतावणे यांनी सुरुवातीला स्वागत केले होते नंतर मात्र त्यांचा विचार बदलला प्रवर्तक का विमान असा या ग्रंथात हरीश खंडेराव यांनी दलित साहित्याला आंबेडकरवादी साहित्य म्हणावे असे आग्रही मत मांडले. चंद्रपूर च्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना वामन निंबाळकर म्हणाले की, दलित हा शब्द जातीवाचक नाही तो कालचा शोषित आजचा संघर्षशील आहे या अर्थाने आम्ही वापरतो. त्याने जर संघर्षाची धार बोथट किंवा संकुचित होत असेल तर उद्या दलित साहित्य हा शब्द फेकून फुले आंबेडकरी विचारांचे साहित्य असा शब्दप्रयोग करतील म्हणजेच वामन निंबाळकर पूर्णता नवीन संज्ञेला स्वीकारत नाहीत डॉ. यशवंत मनोहर यांनी दलित साहित्य आंबेडकरवादी

जीवनमूल्यांचा अविष्कार करणारे साहित्य आहे ही मूल्य विद्रोही आहेत म्हणून दलित साहित्याला आपण आंबेडकरवादी साहित्य असेच म्हटले पाहिजे असे प्रतिपादन केले. दलित साहित्य ही सज्ञा नाकारून आंबेडकरवादी साहित्य ही सज्ञा स्वीकारायची याची काही कारणे विचारवंतांनी सांगितली आहेत ती कारणे अशी आहे की, साहित्य कुठे दलित असते का? दलितत्व ही गोष्ट मानचिन्ह म्हणून मिरवण्यात सारखी आहे का? धर्म स्वीकार केल्यानंतर आपण दलित राहिलो का? दलित साहित्य हे कम्युनिस्टांच्या दावणीला बांधलेले साहित्य आहे? अशी अनेक कारणे सांगून दलित साहित्य या शब्दाची सदैव  नाराजी व्यक्त केलेली दिसते.

दलित हा शब्द आपल्या साहित्याला वापरू नये, तर आंबेडकरवादी साहित्य असे नाव या साहित्याला दिले पाहिजे या अग्रहाची भूमिका मांडताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात आंबेडकर वाद हे संपूर्ण तत्त्वज्ञान आहे ते धर्मातील आणि ईश्वर आतील असे सेक्युलर तत्वज्ञान आहे अध्यात्म वादाला अर्थात त्याची जन्मला त्याचा संपूर्ण आणि तीव्र विरोध आहे कालची आजची आणि उद्याची संपूर्ण प्रतिक्रांती ची परंपरा आंबेडकर वाद ना करतो आंबेडकर वादाला हे क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे आंबेडकरवादी पूर्णता सेक्युलर जाणीव आहे ती धर्मातील आणि ईश्वर आतील अशी आहे या जाणिवेने त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे नियंत्रण होते तो साहित्यिक आंबेडकरवादी साहित्य होय आंबेडकरवादी साहित्य जसे मराठी साहित्याच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे तसे ते भारतीय समाज क्रांतीसाठी ही आवश्यक आहे यासाठी दलित साहित्याचे नाव आंबेडकरवादी साहित्य असावे असा आग्रह त्यांनी धरला होता. हाच शब्द पुढे ठेवून आंबेडकरवादी कवयित्रींनी आपला वेगळा असा स्त्रीवाद मांडलेला दिसतो साहित्यातील स्त्रीवाद आपेक्षा हा आंबेडकरी स्त्रीवाद इथे थोडा वेगळा दिसतो. याचे वेगळेपण नाही कारण विद्वानांनी स्त्रियांबद्दल चांगले चांगले लिहून ठेवलेले आहे जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी वगैरे वगैरे आपल्या समाजात पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मानसन्मान मिळतो का त्यातल्या त्यात आंबेडकरवादी स्त्रियांना हा दर्जा मिळतो का असे असले तरी ज्या वाङ्मय  स्त्रियांची महती गायला जाते त्याच वागण्यातून स्त्रियांना कमीपणा आणणारी विधाने ही आढळून येतात आंबेडकरवादी स्त्रियांवरील आजही आपल्या समाजातील दुर्बल घटकांना अतिशय तुच्छतेने वागणूक दिल्या जाते. आजही त्यांच्यावर मानसिकरीत्या अत्याचार होतच आहेत ब्रिटिश राजवटीत ही स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला फारसा आळा बसला नव्हता दलित म्हणा किंवा आंबेडकरवादी स्त्रियांवरील आत्याच्या मानसिक पातळीवर होणारा आहे या राज्य व्यवस्थेकडून व पुरुष प्रधान कुटूंब व्यवस्थेकडून त्यांच्यावर हा झालेला अन्याय आहे आणि याच अन्यायाची वाचा फोडणारा त्यांचा हा वेगळा स्त्रीवाद आहे आपल्या साहित्यामधून आपल्या कवितेमधून आंबेडकर कवयित्रींनी स्त्रीवादाचे वेगळेपण मांडले आहे वेदना विद्रोह या बाबी त्यांच्या साहित्यातून उमटलेल्या दिसतात.

आंबेडकरवादी स्त्रियांच्या भीषण वास्तवाकडे नजर गेली नाही पावलोपावली माणसाच्या वाट्याला अपमानाच्या गोष्टी दबा धरून बसलेल्या होत्या मानवी मूल्यांचा ऱ्हास होत होता पशुतुल्य जीवन जगावं लागत होतं नकट्या परंपरेने माणसाला पदोपदी छळले होते माणूस असूनही माणसाला मानवतेची जाणीव होऊ दिली नाही बंदिस्त जीवनच आपल्या वाट्याला जाणून-बुजून लागले होते या अपमानाच्या ऊर्जा खाली दलित स्त्रिया जीवन जगत होत्या तेव्हा या गोष्टीला आयुष्याची मुस्कट बाजी सुरू असतानाच काही काळासाठी या दुःखाचा विसर पडावा अशा काही कविता साहित्यक्षेत्रात उदयाला येत होत्या मराठी कविता केशवसुतांच्या काव्यांवर अमुलाग्र बदललेली होती परिवर्तनाचा उषःकाल जाणू लागला होता ही बाब ही समजून घेण्याची वाटते . समान

हक्क समान संधी समान दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा गाभा आहे स्त्री वादाने स्त्री-पुरुषातील नातेसंबंध स्पष्ट करताना पुरुषाच्या बरोबरीने स्त्री ने जीवनाच्या सर्व क्षेत्रात समान दर्जा दिला पाहिजे तिला रोजगाराच्या सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत स्त्रीला संधी दिली तर ती आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटू शकेल . अशा स्त्रीवादाच्या हुंकाराने स्त्रीचा दर्जा काही प्रमाणात सुधारला नाही आहे मात्र दलित स्त्री आहे त्याच जागेवर आहे परंपरेपासून परंपरेने त्या स्त्रीला एका चौकटीत टाकली आहे एक तर ती समाजाच्या मागास प्रवर्गातून येते आणि दुसरी ती स्त्री म्हणून ओळखल्या जाते म्हणून त्या दलित स्त्रीला आपले मागणे लेखणीद्वारे मागावे लागले आणि त्यातूनच आंबेडकरवादी स्त्रियांचे लेखन पुढे आले. आंबेडकरवादी स्त्रियांचे सुरुवातीचे लिखाण हे पुरुषसत्ताक मूल्यांच्या प्रभावातून लिहिले गेले आहे तिची बुद्धी आणि मन हे पुरुष शहरांना होते त्यामुळे त्या वेळचे तिचे लिखाण पुरुषप्रधान व्यवस्थेचे असल्याने त्यात तिचे सत्व जाणवत नाही याची जाणीव आंबेडकरवादी साहित्यातून मिळते सावित्रीबाई फुले ताराबाई शिंदे यांच्या पासून ते छाया दातार विद्या बाळ यांच्यापर्यंत स्त्रीवादाची अनेक वैशिष्ट्ये स्पष्ट होताना दिसते. आ ह साळुंखे यांनी मराठी भाषेत स्त्रियांच्या समान ते संदर्भात मौलिक लेखन केले मल्लिका अमरशेख यांच्या पर्यंत मराठी लेखिकांनी आपल्या लेखनामध्ये स्त्रियांच्या विविध रूपांचा शोध घेतला आहे अश्विनी धोंगडे यांनी स्त्री वादाविषयी स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन हा ग्रंथ लिहिला सीमा साखरे नीलम कोल्हे रजिया पटेल सौदामिनी राव यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर वेळोवेळी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या स्त्रीवाद हा त्यांच्या कवितेतून प्रकट होताना दिसतो त्यांच्या कवितेतून समाजातील जाचक रूढी आणि परंपरा स्त्रियांना जगणे नकोसे करणाऱ्या होत्या त्यात बालविवाह पुनर्विवाह परित्यक्ता विधवा कुमारी हुंडा प्रथा बाल हत्या या वादांच्या प्रश्न सोबतच आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेमध्ये दलित व दलितेतर स्त्रियांचा प्रश्न ही मांडल्या गेलेला दिसतो. आंबेडकरी स्त्रीवादावर प्रवीण चव्हाण यांचा एक एक लेख प्रसिद्ध आहे दलित स्त्रीवाद आणि स्त्रीवादी दलितत्व या लेखात त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचा अपरिहार्य भाग बनलेल्या जाती व्यवस्थेच्या संदर्भात स्त्रीवाद आकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे दलित स्त्रीवादी की दली तत्त्वाची वर्ग जाणीव आणि स्त्रीवादी जाणीव यांच्या एकात्मिक धरणातून निर्माण झालेली अशा स्वरूपाची जाणीव आहे आणि लिंगभाव जडणघडणीच्या कांद्याची असणारी जात जाणीव ही आंबेडकरवादी स्त्रियांच्या केंद्रस्थानी आहे असे प्रतिपादन त्यांनी केले आहे मात्र आंबेडकरवादी स्त्री वादाने जाहीरपणे सिद्धांत पातळीवर आणि व्यावहारिक पातळीवर स्त्रीवादी दलित पणाला नाकारले पाहिजे तसेच पितृसत्ताक व ब्राह्मणी संवेदनशीलतेने बद्दल प्रतिक्रिया नोंदवली पाहिजे असेही त्यांना वाटते छाया दातार यांनी त्यांच्या लेखात स्त्री-मुक्ती चळवळीच्या विविध संकल्पनांचा ऊहापोह करीत मार्क्सवादी स्त्रीवाद जहाल स्त्रीवादी आंबेडकरवादी स्त्रीवाद उदार मतवादी स्त्रीवाद पर्यावरणवादी चर्चा केली आहे.

ज्योती लांजेवार यांच्या कवितेतील आंबेडकरवादी स्त्री जाणीव दिसून येते. ते समस्त स्त्री जीवनाचे भले चिंतणारे आहे स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार तिची होत असलेले विटंबना याविषयी कवयित्रींच्या मनात दाटून आलेले विचार उत्कटपणे अभिव्यक्त होतात कवयित्रीला सामाजिक विषमता अस्वस्थ करते त्या लिहितात,

"नाहीतर आम्हालाही लिहावे लागतील
हिरव्या गवतावर लाल घोषणा

भेटावे लागेल होऊन बनवा
साऱ्या आसमंताला गवसणी घालून
तू तुझा दिन दयाळा चा किताब परत कर.
अनं खुशाल होऊ दे कुरुक्षेत्र या भूमीचे."

**समारोप :-**

एक प्रकारचा आत्मशोध आंबेडकरवादी कवयित्रीना अस्वस्थ करतो यापुढील काळात त्यांच्यावर केलेला अन्याय आहे त्यांना त्या अन्याया विरुद्ध वनवा व्हावे वाटते मानवतेचा त्यांचा हक्क नाकारणाऱ्या या व्यवस्थेला या कवयित्री आव्हान देताना दिसतात. तटस्थतेने अलिप्ततेने आंबेडकरवादी स्त्रियांची कविता अलिप्ततेने स्वतःचा शोध घेताना दिसते . स्त्रीत्वाचा शोध घेताना दिसते 1975 नंतरच्या स्त्रियांच्या कवितेचे हे एक महत्त्वाचे असे सूत्र सांगता येते. या आत्मशोध कवयित्रींना आत्मभान देणारा आहे या आत्मशोधाच्या पाठीमागे बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा असल्याचे दिसते. अशा प्रकारे आपल्याला या कवितेमधून आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेचे वेगळेपण सांगता येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. अश्विनी धोंगडे, स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
२. अरुणा सबाने, स्त्रीवाद - एक दृष्टिक्षेप, आकांक्षा प्रकाशन, नागपूर
३. शरणकुमार लिंबाळे , साठोत्तरी मराठी भांडण यातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
४. संदर्भासहित स्त्रीवाद , स्त्रीवादाचे समकालीन चर्चा विश्व